## नियमित दिवाणी दावा क्र. ४९८/२०२५.

सुरेश खाशाबा पवार व इतर विाा जयवंत प्रल्हाद पवार व इतर.
CNR No.- MHST070045932025.

## निशाणी क्र. १८ वरील आदेश

१. प्रस्तुत अर्ज वादींच्या वतीने दावा मिळकतीं संदर्भात देणेत असलेली उर्वरित न्यायालयीन मुद्रांक शुल्क भरणेस परवानगी मिळणेबाबत दाखल केला आहे. वादींच्या वतीने कथन आहे की, प्रस्तुत दावा विरुध्द कब्जाने मालकीचा जाहीर ठराव होवून निरंतर ताकीदीबाबत आहे. वादींनी घाईगडबडीत दावा मिळकतीचे वर्णन कमी दर्शविले होते. सदर बाब लक्षात येताच, दुय्यम निबंधक, कराडयांच्याकडून आवश्यक ते मुल्यांकन प्राप्त करुन दाखल केले आहे. दावा मिळकतीचे बाजारभावाने मुल्यांकन रक्कम रु.०२,१६,७५०/- होत असून विषयाची किंमत रक्कम रु.०२,१८,७५०/- होत आहे. त्यावर न्यायालयीन मुद्रांक शुल्क रक्कम रु.०८,८३०/- आवश्यक असून यापुर्वी रक्कम रु.०८,०००/- न्यायालयीन मुद्रांक शुल्क भरले आहे. तथापि, उर्वरित रक्कम रु.८३०/- भरणे बाकी आहे. सबब, अर्ज मंजूर करण्याबाबत विनंती केली आहे.

२. प्रतिवादींच्या वतीने नि.क्र.१९ च्या मागील पृष्ठावर म्हणणे दाखल करून आक्षेप नोंदविला आहे. प्रतिवादींच्या वतीने कथन आहे की, वादीचा अर्ज खोटा व लबाडीचा असून प्रतिवादीस त्रास देण्याच्या उद्देशाने दाव्याची आकारणी कमी करुन विचारांती न्यायालयाचा मौल्यवान वेळ व्यथित घालविण्याच्या हेतूने दाखल केला आहे. प्रतिवादींनी दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ०७ नियम ११ नुसार अर्ज दाखल केला असून त्यातील कथन विचारात घ्यावे. सबब, अर्ज नामंजूर करण्याबाबत विनंती केली आहे.

३. अभिलेखावरील कागदपत्रांचे अवलोकन केले. उभयपक्षांतर्फे विद्वान विधीज्ञांचा युक्तिवाद ऐकला.

४. प्रस्तुतचा अर्ज, म्हणणे व अभिलेखावरील कागदपत्रांचे अवलोकन करता पुढील वादप्रश्न विचारार्थ उपस्थित झाले. त्यावरील निष्कर्ष कारणमिमांसेसह खालीलप्रमाणे नोंदिवण्यात येत आहेत;

| अ.क्र. | वादप्रश्न | निष्कर्ष |
|---|---|---|
| १) | अर्ज मंजूर होण्यास पात्र आहे काय ? | **होय.** |
| २) | आदेश काय ? | **अर्ज मंजूर करण्यात येतो.** |

**:: कारणमिमांसा ::**

**वादप्रश्न क्र.१ करीता :-**

५. अभिलेखाचा विचार करता, प्रस्तुत दावा विरुध्द कब्जाने मालकी हक्क असल्याचे जाहीर ठराव करुन निरंतर ताकीदीबाबत आहे. दावा मिळकत स्थावर मालमत्ता आहे. अर्जातील कथन विचारात घेता, वादी हे स्वतःहून दावामिळकतीच्या मुल्यांकन पत्रकानुसार उर्वरित न्यायालयीन मुद्रांक शुल्क रक्कम रु.८३०/- जमा करण्यास परवानगी मागत आहेत. सदर शुल्क अंशतः असून वादींनी यापुर्वी रक्कम रु.०८,०००/- मुद्रांक शुल्क अदा केले आहे. त्यावरुन वादीचे कृत्य अप्रामाणिकपणाचे नसल्याचे स्पष्ट होते. वादाचे स्वरूप पाहता, उभय पक्षकारांमधील वादग्रस्त असलेला खराखुरा प्रश्न निर्णीत होणे आवश्यक आहे. त्याकरीता, वादींना उर्वरित नाममात्र रक्कम रु.८३०/- न्यायालयीन मुद्रांक शुल्क जमा करण्याची परवानगी देणे आवश्यक आहे. अर्ज मंजूर केल्यास प्रतिवादीचे काही एक नुकसान होणार नाही. तथापि, उभय पक्षकारास त्या संदर्भात पुरावा देण्याची संधी प्राप्त होऊन वादाचे निवारण होणार आहे. या उलट, अर्ज नामंजूर झाल्यास वादींस नैसर्गीक न्याय तत्व नाकारले जाऊन प्रकरणांची गुंतागुंत वाढण्याची शक्यता आहे. त्यामुळे मी या मतास आहे की, अर्ज मंजूर होणेस पात्र आहे. सबब, वादप्रश्न क्र.१ चा निष्कर्ष होकारार्थी नोंदवीला आहे.

**वादप्रश्न क्र.२ करीता :-**

६. उपरोक्त उहापोह विचारात घेता अर्ज मंजूर होणेस पात्र आहे. त्यामुळे वादाचे स्वरूप विचारात घेता, मी या मतास आहे की, दाव्याच्या प्राथमिक स्थितीत कोणा एका पक्षकारावर खर्च बसवणे योग्य व न्यायाचे नाही. सबब, न्यायदृष्टीने, मी पुढीलप्रमाणे आदेश करीत आहे;

# <u>आदेश</u>

१) वादींचा अर्ज निशाणी क्र. १८ मंजूर करण्यात येतो.

२) वादींना अर्जात नमूद केल्याप्रमाणे रक्कम रु.८३०/- न्यायालयीन मुद्रांक शुल्क भरण्यास परवानगी देण्यात येते.

३) या अर्जाचा खर्च अंतीम निर्णय ज्याच्या पक्षात होईल त्यास देणेत यावा.

(आदेश खुल्या न्यायालयात घोषित करण्यात आला)

Digitally signed by UTPAT ATUL ARUN
Date: 2025.12.19 17:39:07 +0530

(अ.अ. उत्पात)

दिनांक :- १९/१२/२०२५.

५ वे सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर,
कराड, जि. सातारा.